# तलवारबाजी

*ईशा सरदेसाई यांच्याद्वारे पुनर्लिखित*

तलवारी वेगाने हवेत फिरत होत्या. ज्या लोकांच्या हातात तलवारी होत्या, ते अतिशय सावधपणे त्यांना चालवत होते, त्यांच्या पायांमध्ये चपळपणा होता, त्यांचे पोशाख त्यांच्या प्रत्येक पावलागणिक गोलाकार फिरत होते. ज्या हॉलमध्ये ते सराव करत होते, त्याच्यापासून काही अंतरावरच दृष्टीस पडत होता, माउंट फूजी. त्याची दिमाखदार शुभ्र शिखरे, पायथ्याशी वसलेल्या गावांमध्ये घडणाऱ्या प्रत्येक घटनेची साक्षीदार होती.

शिरोहा, हा एक युवक होता ज्याचे वय अंदाजे वीस वर्षे होते आणि तो आश्चर्याने तलवारबहाद्दरांकडे पाहत होता. त्याला नेहमीच मार्शल आर्ट शिकण्याची इच्छा होती, पण त्याचे कुटुंब इतके निर्धन होते की, ते त्याला या शिक्षणासाठी पाठवू शकले नाही. त्याची मनापासून इच्छा होती की, तोदेखील जर त्या लोकांसोबत तिथे असू शकला असता तर; तलवारबाजीत त्या लोकांसारखाच तेज आणि चपळ.

तलवारबाजीच्या या विशिष्ट कौशल्याला केन्डो म्हटले जात असे आणि जपानमध्ये हे पूजनीय मानले जात असे. युद्धापेक्षाही याचा उद्देश होता, याची दीक्षा घेणाऱ्या व्यक्तींच्या चारित्र्याचा विकास करणे —

त्यांच्यामध्ये अनुशासन, सन्मान तसेच सत्यनिष्ठता हे गुण विकसित करणे. खरेतर या तलवारबहाद्दरांच्या चालीत विशेष असे काही होते — युद्ध करतानाच नव्हे, तर इतर वेळीदेखील — असे वाटत असे की, जणू ते सभोवतालचे वातावरणच बदलून टाकत आहेत. जेव्हाही शिरोहा त्यांच्या उपस्थितीत असायचा, तेव्हा तो ताठ उभा राहत असे. त्याचे शरीर, त्याचे संपूर्ण अस्तित्व सन्मानासह प्रतिक्रिया दिल्याविना राहूच शकत नसे.

त्या दिवशी बरेच विद्यार्थी दोघा-दोघांच्या समूहात तलवारबाजीचा अभ्यास करत होते. कित्येक तास ते हा अभ्यास करत होते; सूर्यप्रकाशात त्यांच्या तलवारी चांदीप्रमाणे चमकत होत्या. शेवटी सेन्सेई म्हणजे शिक्षकांनी हॉलमध्ये प्रवेश केला आणि ते हॉलच्या पुढच्या बाजूला आले. त्यांचे वय बरेच होते, त्यांचा जबडा मजबूत होता आणि त्यांचे काही केस काळे तर काही पांढरे होते.

“आता तुम्ही आपल्या तलवारी खाली ठेवू शकता,” सेन्सेईंनी घोषणा केली. “आजच्याकरता इतकेच पुरेसे आहे.”

विद्यार्थ्यांनी आपल्या सामानाची आवराआवरी करायला सुरुवात केली आणि त्याचवेळी शिरोहा धावतच या व्यक्तीजवळ येऊन पोहोचला.

शिरोहा म्हणाला, “सेन्सेई, मी तुमच्याकडून तलवारबाजी शिकू इच्छितो.”

सेन्सेईंनी त्याच्याकडे लक्षपूर्वक पाहिले. “तू शिकणार?” ते म्हणाले.

“होय,” शिरोहाने उत्तर दिले. “माझ्याकडे शिकण्यासाठी पैसे नाहीत, परंतु तुम्ही जर मला तुमचा शिष्य म्हणून पत्करले, तर मी खूप, खूप परिश्रम करेन. पाहालच तुम्ही.”

“अच्छा? किती कठोर परिश्रम करण्याची तयारी आहे तुझी?” सेन्सेईंनी आपल्या भुवया उंचावत विचारले.

“मी उद्यापासून दररोज तुमच्या वर्गात येईन.”

“ही एक चांगली सुरुवात आहे,” सेन्सेई म्हणाले. “तू जर या गतीने शिकत राहिलास, तर वीस वषानंतर एक बरा तलवारबहाद्दर बनशील.”

हे ऐकून शिरोहा थक्कच झाला. त्याला वीस वषापयत शिकत राहावे लागेल? केवळ एक बरा तलवारबहाद्दर बनण्यासाठी?

त्याला लगेचच स्वतःची चूक लक्षात आली. “मी आणखी जास्त शिकेन!” तो म्हणाला. “मी वर्ग सुरू होण्याआधी आणि वर्ग संपल्यानंतरही शिकेन. मी सकाळपासून रात्रीपयत शिकेन.”

सेन्सेई विचार करू लागले.

“मग तर तुला, तीस किंवा चाळीस वर्षांनंतरच तलवार चालवता येईल.”

शिरोहाला काहीच कळत नव्हते. आता त्याला चाळीस वर्षे लागतील?

“मी रात्रभर शिकेन” तो म्हणाला.

“पन्नास वर्षे,” सेन्सेई म्हणाले.

“मी कमी वेळा जेवण करेन. मी इतर कोणतीही कामे करणार नाही. मी, केन्डोवर आणि फक्त केन्डोवरच लक्ष केंद्रित करेन!”

“ओऽऽऽ,” सेन्सेई म्हणाले, “तू जर असे केलेस, तर कदाचित तू तुझ्या आयुष्याच्या अखेरपयत्त निपुणता प्राप्त करू शकशील. होय, पण याची काहीच शाश्वती नाही. असेसुद्धा होऊ शकते की, तेव्हादेखील तुझे शिष्यत्व पूर्णत्वास नेण्यासाठी तुला पुढच्या जन्मातील काही वर्षे द्यावी लागतील.”

शिरोहाकडे बोलण्यासाठी शब्दच उरले नव्हते.

शेवटी तो म्हणाला, “कृपा करून मला सांगा की, तलवारबाजी शिकण्यासाठी मी काय करू शकतो. तुम्ही जसे म्हणाल, तसेच मी करेन. कितीही वेळ लागला, तरीही मी प्रयत्न करत राहीन.”

सेन्सेई हसले. “तर मग ठीक आहे,” ते म्हणाले. “उद्या परत ये आणि आपण तेव्हापासूनच पुढे सुरुवात करू.”

मग दुसऱ्या दिवशी सकाळी, सूर्योदय होताच, शिरोहा परत आला. त्याने या प्रसंगासाठी नवीन कपडे परिधान केले होते. मी आज कोणते डावपेच शिकणार आहे? कौतुकाने, तो विचार करत होता. कोणत्या चाली, तलवारीचे कोणते वार?

हॉलकडे जातानाही तो याच विचारात गर्क होता, त्याच्या चेहऱ्यावर हरवल्यागत एक हास्य होते. पण मग जेव्हा तो जवळ पोहोचला, तेव्हा त्याच्या लक्षात आले — तिथे तर कोणीच नव्हते!

शिरोहा गोंधळून जात आजुबाजूला पाहू लागला. “सेन्सेई?” त्याने हाक मारली. “तुम्ही इथे आहात का?”

सेन्सेई हॉललगतच असलेल्या एका छोट्या घरात राहत असत. जेव्हा शिरोहा सेन्सेईंना हाका मारत होता, तेव्हा त्याला घरातून येत असलेला एक आवाज ऐकू आला. क्षणभरानंतर, सेन्सेईंचा एक सेवक वेगाने चालत बाहेर आला; त्याच्या हातात एक झाडू आणि ओला कपडा होता.

“शिरोहा?” सेवक म्हणाला. “हे घे.” त्याने झाडू आणि कपडा शिरोहाच्या हातात थोपवला. “सेन्सेईंनी हे तुला देण्यास सांगितले आहे.”

शिरोहा हैराण होत झाडू आणि कपड्याकडे पाहू लागला. “यांचे मी काय करू?” तो म्हणाला.

“काय अर्थ आहे तुझ्या म्हणण्याचा?” सेवकाने विचारले. “तुला या हॉलची साफसफाई करायची आहे.”

“परंतु — निश्चितच काहीतरी चूक झाली आहे. मी इथे साफसफाई करण्यासाठी आलेलो नाही. मी इथे केन्डो शिकण्यास आलो आहे!”

“सेन्सेई अशा प्रकारच्या चुका करत नाहीत,” सेवक म्हणाला. “आता, मी जर तुझ्या जागी असतो, तर साफसफाई करण्यास सुरुवात केली असती. लवकरच लोक सराव करण्यासाठी येतील.”

सेवक निघून गेला आणि शिरोहा एकटक त्याच्याकडे पाहात राहिला, त्याच्या हातात झाडू आणि कपडा लटकत होता. शेवटी त्याने जमिनीकडे पाहिले, तिथे थोडी धूळ जमा झालेली होती. त्याने एक दीर्घ श्वास घेतला आणि आपले काम करायला सुरुवात केली.

जवळपास एक तास तो साफसफाई करत राहिला; त्याचा चेहरा उतरलेला होता, तो नाराजीने हळूहळू झाडू फिरवत होता. आणि मग अचानक — खचाक!

“अरे ऐक!” ते म्हणाले.

त्याने वळून मागे पाहिले तर त्याचे गुरू शांतपणे त्याच्याकडे पाहून स्मितहास्य करत होते.

“सेन्सेई!” शिरोहा आश्चर्याने म्हणाला. सेन्सेईंच्या हातात एक बारीक लाकडाची तलवार होती. “काय — तुम्ही आत्ता मला मारले होते का?”

“का बरे, होय, मीच मारले होते” सेन्सेई म्हणाले.

“पण — का?” शिरोहाने विचारले. “तुम्ही सांगितल्यानुसार मी हॉलची साफसफाई करतो आहे.”

“होय, तू करतो आहेस,” सेन्सेई म्हणाले. “परंतु याचा अर्थ असा नव्हे की, तू तयारीत राहू नयेस.”

एकदा पुन्हा शिरोहाकडे बोलण्यासाठी काही शब्दच नव्हते.

“ठीक आहे, माझ्याकडे असे पाहात राहू नकोस.” सेन्सेई म्हणाले. “कामाला लाग पुन्हा.”

आणि शिरोहा साफसफाई करत राहिला. त्याने जेव्हा साफसफाई संपवली, तेव्हा सेन्सेईंनी त्याला स्वयंपाकघरात जाऊन दुपारचा स्वयंपाक तयार करण्यास सांगितले. शिरोहाचा स्वयंपाक तयार झाल्यावर, सेन्सेईंनी त्याला आपल्या घराच्या सभोवती असलेल्या बागेची देखभाल करायला सांगितले.

वेळोवेळी शिरोहा या गोष्टीप्रति जेव्हा कमी संदिग्ध असायचा — *खचाक!* सेन्सेई मागून लाकडाच्या तलवारीसह दबक्या पावलांनी येत. वारंवार असेच घडत राहिले, दिवस जसजसा संपायला आला, तसतसे शिरोहाला वाटू लागले की, तो खूपच त्रस्त झाला आहे आणि आता तर त्याच्या सहनशीलतेचा अंतच होणार होता.

संध्याकाळी जेव्हा शिरोहा परत जाण्याची तयारी होता, तेव्हा सेन्सेईंने सांगितले, “काय मग शिरोहा . . . तू उद्या परत येणार आहेस ना?”

शिरोहा थांबला.

“होय सेन्सेई,” तो शांतपणे म्हणाला.

***

कित्येक महिने शिरोहा सेन्सेईंसाठी काम करत राहिला; तो सर्व प्रकारची कामे करत असे. या दरम्यान त्याला एकदाही केन्डोच्या सराव सत्रांमध्ये भाग घेण्याची संधी मिळाली नाही; त्याला एकदाही तलवार चालवण्याची संधी मिळाली नाही. तो नेहमी आपल्या प्रशिक्षणाच्या बाबतीत सेन्सेईंशी बोलत असे. तो संकोचून म्हणत असे, “माफ करा . . . सेन्सेई, मी आज तलवारबाजी शिकू शकतो का?”

आणि प्रत्येक वेळी सेन्सेई म्हणत असत, “धीर धर, शिरोहा. तू जे शिकायला हवे आहेस, ते तू शिकतो आहेस.”

या पूर्ण कालखंडादरम्यान सेन्सेई अचानकच आपल्या लाकडी तलवारीसह तिथे पोहोचत असत. *खचाक* — जेव्हा शिरोहा भाजी चिरत असायचा. *खचाक* — जेव्हा शिरोहा फरशी पुसत असायचा. *खचाक, खचाक, खचाक* — जेव्हा शिरोहा झाडांची छाटणी करत असायचा.

परंतु, अशा प्रकारे काळ लोटत असतानाच एक मजेशीर घटना घडली. शिरोहा एकाग्रतेने आपले काम करायचा; त्याचे लक्ष पूर्णपणे स्वतःच्या कामावर असायचे. परंतु त्याच्या शरीराने ऐकायला सुरुवात केली होती. असे वाटत होते की, जणू त्याची जागरूकता विस्तृत आणि व्यापक होते आहे, त्याच्या जागरूकतेला एक नवीन स्वरूप प्राप्त झाले असावे — किंवा कदाचित हे स्वरूप कायम होतेच पण आता तो फक्त ते शोधून काढू शकत होता. हवेत फिरणाऱ्या तलवारीचा हलकासा आवाजदेखील तो ऐकू शकत होता; आणि तलवार त्याच्यापयत्त पोहोचण्याच्या आधीच त्याला सहजतेने हे लक्षात येत असे की, काय करायला हवे. त्याला माहित असायचे की, कुठे जायला हवे. हे एखाद्या नृत्याप्रमाणे

होऊन गेले होते; तलवार त्याच्यावर वार करत असे, तो हलकेच एका बाजूला सरकत असे. तलवारीने त्याच्यावर वार होत असे आणि हा वार रोखून धरण्यासाठी त्याचा हात आपसूकच वर उठत असे.

एके दिवशी शिरोहा बाहेर बागेत होता. ती जागा अतिशय सुंदर होती — झाडावरील पानांचा रंग गडद लाल होता, माउंट फूजीचे शिखर सूर्यप्रकाशात चमचमत होते.

*सन्ऽऽऽ.*

शिरोहा तो आवाज जाणत होता. आणि जेव्हा त्याचे कान हा आवाज लक्षपूर्वक ऐकू लागले, तेव्हा इतर सर्व काही शांत झाले. सर्व गोष्टींमध्ये संथपणा आला; काळ थांबल्यासारखा झाला. त्याला स्वतःच्या हृदयाची धडधड ऐकू येऊ लागली, स्वतःच्या फुफ्फुसात वाहणाऱ्या हवेचा आवाज ऐकू येऊ लागला — आणि एका प्रवाहासमवेत तो किनाऱ्याच्या दिशेने वळला. त्याने सेन्सेईंचा पुढे आलेला हात पकडला आणि तलवारीची मूठ सेन्सेईंच्या हातातून खेचून घेत आपल्या हातात घेतली.

“ओह!” शिरोहा म्हणाला. काळ पुन्हा आपल्या गतीने चालू लागला आणि त्याने तलवारीला पहिल्यांदाच व्यवस्थितपणे पाहिले. त्याला आपल्या हातात तिचे वजन जाणवले. “सेन्सेई, ही तर खरी तलवार आहे.”

“होय,” सेन्सेई म्हणाले.

“सेन्सेई, मला काही कळतच नाही,” शिरोहा म्हणाला.

“मला तुझा अभिमान वाटतो, शिरोहा,” सेन्सेईंनी उत्तर दिले. “पाहा, केन्डोच्या बाबतीत तुझी समज किती वाढली आहे.”

“काय म्हणायचे आहे तुम्हाला?” शिरोहाने विचारले. “मी तर अद्याप माझा सराव सुरूदेखील केलेला नाही.”

“तुला काय वाटते, तू काय करत होतास शिरोहा; त्या सर्व प्रसंगांमध्ये, ज्या वेळी तू माझ्या तलवारीच्या वारांचा सामना केलास?”

शिरोहाने क्षणभर विचार केला.

“ मला वाटते . . . मी तेच करत होतो, जे माझ्या अंतरातून येत होते.”

शिरोहाने सेन्सेईंकडे पाहिले; त्यांच्या चेहऱ्यावर एक चमक होती.

“होय,” सेन्सेई म्हणाले. “होय, अगदी बरोबर. तू तेच केलेस, जे तुझ्या अंतरातून उद्भवले. आता तू माझ्या वर्गात येऊ शकतोस.”

© २०१९ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.